# मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ.
## दि.८/०९/१० रोजी झालेल्या मंडळाच्या २५८ व्या बैठकीचे ठराव.

**बाब क्र.२५८/२ :-** **जागतिक बँक प्रकल्प, सर्व्हे क्र. ४१ चारकोप येथील आरएससी ६ लगत माध्यमिक शाळेसाठी आरक्षित असलेल्या भूखंडावर मुंबई विकास नियंत्रण नियम क्र. ३३(२) मधील तरतुदीनुसार अतिरिक्त वाढीव क्षेत्रासाठी ना हरकत देण्याबाबत.**

**ठराव क्र. :-२५८/२८४६** **दिनांक :- ०८/०९/१०**

कला विद्यामंदिर ट्रस्ट या संस्थेस जागतिक बँक प्रकल्प, सर्व्हे क्र. ४१ चारकोप येथील आरएससी ६ लगत माध्यमिक शाळेसाठी आरक्षित असलेल्या भूखंडावर मुंबई विकास नियंत्रण नियम क्र. ३३(२) मधील तरतुदीनुसार २४५०.७० चौ.मी व जागतिक बँक प्रकल्प, सर्व्हे क्र. २६३ मालवणी येथील आरएससी १९ लगत माध्यमिक शाळेसाठी आरक्षित असलेल्या भूखंडावर मुंबई विकास नियंत्रण नियम क्र. ३३(२) मधील तरतुदीनुसार ८३० चौ.मी. अतिरिक्त वाढीव क्षेत्रासाठी ना हरकत देण्याबाबतचा प्रस्तावावर सन्मा. सदस्य श्री. भरत पारेख व श्री. विरेंद्र उपाध्याय यांनी विचारलेल्या माहितीसह प्रशासनाने पुढील बैठकीत सादर करावा. दोन्ही प्रस्ताव प्रशासनाकडे परत पाठविण्यात यावेत.

ठराव एकमताने मंजूर

**बाब क्र.२५८/३ :-** **जागतिक बँक प्रकल्प, सर्व्हे क्र. २६३ मालवणी येथील आरएससी १९ लगत माध्यमिक शाळेसाठी आरक्षित असलेल्या भूखंडावर मुंबई विकास नियंत्रण नियम क्र. ३३(२) मधील तरतुदीनुसार अतिरिक्त वाढीव क्षेत्रासाठी ना हरकत देण्याबाबत.**

उपमुख्य अधिकारी (डब्ल्यु) यांनी याबाबत सविस्तर माहिती बाब क्र.२ प्रमाणे पुढील बैठकीत सादर करण्यात येईल असे सांगितले.

**बाब क्र. २५८ / ४ :- शासनाच्या निर्देशानुसार ०१ लाख घरांच्या निर्मीतीच्या अंमलबजावणीकरीता सुधारीत विकास नियंत्रण नियमावली ३३(५) नुसार कार्यवाही करण्याबाबत.**

**<u>ठराव क्र.२८४७</u>** **दि.०८/०९/२०१०**

अभिहस्तांतरीत संस्थेने/विकासकाने दि.०८/०९/१० पासून एक वर्षाच्या आत म्हाडाकडून ना हरकत प्रमाणपत्र प्राप्त करुन घेवून,इमारतीचा पुनर्विकास करावा,अन्यथा सदरहू इमारतीचा पुनर्विकास म्हाडा स्वतः करण्याची आवश्यकती कार्यवाही करेल.

याबाबत सर्व वसाहतीतील गृहनिर्माण संस्थांना / इमारतींना संबंधीत मिळकत व्यवस्थापनाने कळविण्यात यावे.

ठराव एकमताने मंजूर.

**<u>ठराव क्र.२८४८</u>** **दि.०८/०९/२०१०**

अभिहस्तांतरीत न झालेल्या इमारती/ संस्थांच्याबाबत अभिहस्तांतरणाची प्रक्रिया जलद गतीने करुन त्याचा अहवाल मंडळाच्या प्रत्येक बैठकीत सादर करण्यात यावा.

ठराव एकमताने मंजूर.

**<u>ठराव क्र.२८४९</u>** **दि.०८/०९/२०१०**

मुंबई गृहनिर्माण मंडळाने शासनाच्या दि.०६/१२/०८ रोजी सुधारीत विकास नियंत्रण नियमावली ३३(५), प्राधिकरण ठराव क्र.६३८३,दि.२४/०२/०९ व प्राधिकरण

ठराव क्र.६३९७,दि.०५/०५/०९ नुसार ३३(५) २C(i) व २C(ii) प्रमाणे पुनर्विकास करण्याचा निर्णय घेतला आहे.

ठराव एकमताने मंजूर.

**<u>चर्चेचे विषय</u> :** टागोर नगर, कन्नमवार नगर विक्रोळी, दिंडोशी मालाड व इतर वसाहतींचा पुनर्विकास म्हाडामार्फत करण्याबाबत ठराव करण्यात यावा.

**<u>ठराव क्र.२८५०</u>** **दि.०८/०९/२०१०**

१. मुंबई मंडळाचे वास्तुशास्त्रज्ञ विभागाने कन्नमवार नगर व टागोर नगर वसाहतीचे पुनर्विकासाबाबत झोपडपट्टी कायद्यातील ३/क अन्वये मा.उप सभापती व मुख्य अधिकारी/मुं.मं. यांचेकडे सादर केलेल्या प्रस्तावांबाबत तीव्र नाराजी व्यक्त केली आहे.

२. कन्नमवार नगर, विक्रोळी व टागोर नगर, विक्रोळी या दोन्ही वसाहतींचा म्हाडामार्फत पुर्नविकास केल्यास कन्नमवार नगर, विक्रोळी येथील ४५ चौ.मी. क्षेत्रफळाच्या ८४२० सदनिका व टागोर नगर, विक्रोळी येथे ३० चौ.मी. च्या २२९५० सदनिका अशा एकूण ३१३७० सदनिका निर्माण होतील. या सदनिकांच्या विक्रीनंतर अनुक्रमे म्हाडास अंदाजे रु. २९६४ + रु. १९०५ असे एकूण रु. ५०६९ कोटी म्हाडास मिळतील.

म्हाडास सर्वसामान्य जनतेस सोडतीद्वारे उपलब्ध होणा-या एकूण ३१३७० सदनिका व त्यांची विक्रीतून मिळणारे रु. ५०६९ कोटी निधी हे विकास नियंत्रण नियमावली ३३(५) २ C (i) व २ C (ii) पेक्षा अधिक फायदेशीर असल्यामुळे म्हाडा मार्फत पुनर्विकास करावयाचा निर्णय घेतला आहे.

३. कन्नमवार नगर, टागोर नगर व दिंडोशी मालाड व इतर वसाहतीतील अभिहस्तांतरीत प्रक्रियेतील इमारतींना पुनर्विकसामध्ये समाविष्ट करावे किंवा ना हरकत प्रमाणपत्र दयावे याबाबत नियमानुसार कार्यवाही करण्यात येईल.

४. कन्नमवार नगर,टागोर नगर,विक्रोळी व दिंडोशी मालाड व इतर वसाहतींची पुर्नबांधणीची निविदा मागवून अथवा बी.जी.शिर्के कंपनी सारख्या म्हाडाच्या पॅनेलवरील

शासन मान्यता प्राप्त ठेकेदारांकडून करुन घेण्याबाबत निर्णय, मुंबई मंडळ प्राधिकरणास शिफारस करीत आहे.

५. वरील सर्व ठराव म्हाडाच्या दिनांक ०९/०९/२०१० रोजीच्या बैठकीत सादर करण्यात यावेत.

ठराव एकमताने मंजूर.